# मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय

क्रमांक:- ईएलआर-२०२४/प्र.क्र.३४७/२४/निवडणूक
सामान्य प्रशासन विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक :- २३ मार्च, २०२४.

प्रति,

१. सर्व विभागीय आयुक्त.
२. सर्व जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी.

विषय :- लोकसभा सार्वत्रिक निवडणूक, २०२४ तसेच ३०-अकोला पश्चिम विधानसभा मतदारसंघ पोटनिवडणूक, २०२४ मतदारांची ओळख पटविण्याबाबत...

संदर्भ :- भारत निवडणूक आयोगाचे क्र. 3/4/ID/2024/SDR/VOL.I, दि.१९/०३/२०२४ चे पत्र व त्यासोबतचा समक्रमांक व समदिनांकाचा आदेश.

महोदय / महोदया,

भारत निवडणूक आयोगाचे दि.१९/०३/२०२४ चे पत्र त्यासोबतच्या आदेशाच्या इंग्रजी / हिंदी प्रतीसह सोबत जोडले आहे. लोकसभा सार्वत्रिक निवडणूक, २०२४ तसेच ३०-अकोला पश्चिम विधानसभा मतदारसंघ पोटनिवडणूक, २०२४ करीता, ज्या मतदारांना छायाचित्रासह मतदार ओळखपत्र देण्यात आलेले आहे ते मतदार, मतदान केंद्रावर त्यांची ओळख पटविण्यासाठी छायाचित्रासह मतदार ओळखपत्र सादर करतील. जे छायाचित्रासह मतदार ओळखपत्र (EPIC) सादर करु शकत नाहीत असे मतदार त्यांची ओळख पटविण्यासाठी मतदार ओळखपत्राच्या (EPIC) व्यतिरिक्त खालील नमूद कागदपत्रे पुरावा म्हणून सादर करतील, असे आदेश आयोगाने दिलेले आहेत.

i. आधार कार्ड (Aadhaar Card)
ii. मनरेगा जॉब कार्ड (MNREGA Job Card),
iii. बँक/पोस्ट ऑफिसने जारी केलेल्या छायाचित्रासह पासबुक (Passbooks with photograph issued by Bank / Post Office),
iv. कामगार मंत्रालयाच्या योजने अंतर्गत जारी केलेले आरोग्य विमा स्मार्ट कार्ड (Health Insurance Smart Card issued under the scheme of Ministry of Labour),
v. वाहन चालक परवाना (Driving License),
vi. पॅन कार्ड (Pan Card),
vii. रजिस्ट्रार जनरल ऑफ इंडिया यांचेद्वारा नॅशनल पॉप्युलेशन रजिस्टर अंतर्गत निर्गमित स्मार्ट कार्ड (Smart Card issued by RGI under NPR)
viii. भारतीय पासपोर्ट (Indian Passport)
ix. फोटोसह पेन्शन दस्तऐवज (Pension document with photograph),
x. केंद्र / राज्य सरकार / सार्वजनिक उपक्रम / पब्लिक लिमिटेड कंपन्या यांनी कर्मचाऱ्यांना जारी केलेले सेवा ओळखपत्र (Service Identity Cards with photograph issued to employees by Central/State Govt. /PSUs/Public Limited Companies),
xi. खासदारांना / आमदारांना जारी करण्यात आलेले अधिकृत ओळखपत्र (Official identity cards issued to MPs/MLAs/MLCs) आणि

xii. भारत सरकारच्या सामाजिक न्याय व सशक्तीकरण मंत्रालयाने जारी केलेले विशेष विकलांगता प्रमाणपत्र (Unique Disability ID (UDID) Card, M/o Social Justice & Empowerment, Government of India)

२. छायाचित्रासह मतदार ओळखपत्राव्दारे मतदाराची ओळख पटत असेल तर मतदार ओळखपत्रातील कारकुनी त्रुटी, शब्दलेखनातील चुका ईत्यादी किरकोळ विसंगती दुर्लक्षित करण्यात याव्यात. तसेच मतदाराचे नाव, तो ज्या ठिकाणी मतदान करीत आहे त्या मतदारयादीत आहे, परंतु त्याच्याकडे अन्य विधानसभा मतदारसंघाच्या मतदार नोंदणी अधिकारी यांनी वितरीत केलेले छायाचित्रासह मतदार ओळखपत्र असल्यास ते स्विकारण्यात यावे .छायाचित्रासह मतदार ओळखपत्रावरील विसंगत छायाचित्रामुळे मतदाराची ओळख पटणे / पटविणे शक्य नसल्यास मतदारास उपरोक्त पर्यायी कागदपत्रांपैकी एक ओळख कागदपत्र सादर करणे आवश्यक राहील .

३. प्रवासी भारतीय मतदारांना त्यांची ओळख पटविण्यासाठी त्यांचा केवळ मूळ पासपोर्ट (Original Passport) आवश्यक राहील.

४. मतदारांना त्यांच्या मतदान केंद्राचा, मतदार यादीतील अनुक्रमांक, मतदानाची तारीख, वेळ इ., माहीती उपलब्ध होणेसाठी भारत निवडणूक आयोगाने त्यांचे पत्र क्रमांक **464/INST/VIS/2023/EPS**, दिनांक ८ जून, २०२३ अन्वये मतदारांना "फोटो वोटर स्लीप" ऐवजी "मतदार माहिती चिठ्ठी"(Voter Information Slip) वितरीत करणेच्या सुचना दिलेल्या आहेत. मतदार माहिती चिठ्ठीमध्ये मतदान केंद्र, मतदानाची तारीख व वेळ इ. माहिती समाविष्ट असेल.सदर "मतदार माहिती चिठ्ठी" सर्व मतदारांना मतदानाच्या दिनांकाच्या किमान ५ दिवस अगोदर प्राप्त होईल असे वाटप करावे. तथापि, मतदारांच्या ओळखीचा पुरावा म्हणून मतदार माहिती चिठ्ठी ग्राह्य असणार नाही.

५. या पत्रासोबत असलेले आयोगाचे आदेश हे निवडणूक निर्णय अधिकारी व सर्व मतदान केंद्राध्यक्ष यांच्या निदर्शनास आणून देण्यात यावेत. तसेच निवडणूक निर्णय अधिकारी यांनी विशेष ब्रिफिंगमधून आयोगाच्या या आदेशाचे तात्पर्य व त्यातील तपशिल सर्व मतदान केंद्राध्यक्ष यांना समजावून सांगावा. या आदेशाचे मराठी भाषेमध्ये भाषांतर करुन घेऊन त्याची प्रत प्रत्येक मतदान केंद्राध्यक्ष यांना पुरविण्यात यावी. निवडणूक निर्णय अधिकारी यांनी या आदेशाची प्रत सर्व मतदान केंद्राध्यक्ष यांना उपलब्ध झाल्याची खात्री करावी.

६. या पत्रासोबत असलेल्या आयोगाच्या आदेशास प्रिंट/इलेक्टॉनिक माध्यमांव्दारे मतदानाच्या दिवसापर्यत नियमित प्रसिध्दी देण्यात यावी. स्थानिक वृत्तपत्रांमधूनही यास प्रसिध्दी देण्यात यावी. आयोगाचे सदर आदेश मान्यताप्राप्त सर्व राजकीय पक्षांना आणि लोकसभा सार्वत्रिक निवडणूक ,२०२४ तसेच ३०-अकोला पश्चिम विधानसभा मतदारसंघ पोटनिवडणूक ,२०२ ४या निवडणूकीतील संबंधित उमेदवारांना लेखी कळविण्यात यावे, ही विनंती.

आपला,

(मनोहर पारकर)
उप सचिव तथा सह मुख्य निवडणूक अधिकारी,
महाराष्ट्र राज्य

सोबत :- वरीलप्रमाणे

प्रत, माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित,

१.सर्व निवडणूक निर्णय अधिकारी (जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी यांचेमार्फत)

२.सर्व उप जिल्हा निवडणूक अधिकारी